कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२१-२२/१८७१
दि.१२/११/ २०२१

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ७२ वी मराठी 'ब' गट नाट्यस्पर्धा दि.३ जानेवारी २०२२ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण २२ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा रविंद्र भवन, साखळी यांच्या सहकार्याने पं. मनोहरबुवा शिरगांवकर नाटयगृहात, रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. ७ फेब्रुवारी २०२२ पर्यंत चालणार आहे. शासनाने घालून दिलेली कोविड-१९ च्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन या स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि.३ जानेवारी २०२२ रोजी **कालिका थिएटर्स्, कळंगूट** या संस्थेच्या जयवंत दळवी लिखित " **नाती गोती"** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि. ४ जानेवारी रोजी चि.त्र्यं. खानोलकर यानी लिहिलेले **"कालाय तस्मै नमः"** हे नाटक **प्रतीक कला प्रॉडक्शन, मौळा-भाटी, तिसवाडी** ही संस्था सादर करणार आहे. **ॐ कलासृष्टी-बांदोडा, फोंडा** या संस्थेच्या वतीने गोविंद पुरुषोत्तम देशपांडे लिखित **"चाणक्य विष्णुगुप्त"** हे नाटक दि.५जानेवारी रोजी होईल. मधुसूदन कालेलकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **"ही श्रींची इच्छा"** हे नाटक दि.६ जानेवारी रोजी **श्री शांतादुर्गा कल्चरल आणि स्पोर्ट्स क्लब, वारखंड-पेडणे** ही संस्था सादर करेल तर दि. ७ जानेवारी रोजी प्रदीप दळवी यांनी लिहिलेल्या **"मी नथुराम गोडसे बोलतोय"** या नाटकाचा प्रयोग **ब्रह्मदेव युवक संघ, ब्रह्माकरमळी, वाळपई-सत्तरी** ही संस्था सादर करणार आहे. दि.१० जानेवारी रोजी बादल सरकार यांच्या लेखणीतून साकार झालेले व पु.ल. देशपांडे यांनी अनुवादित केलेले **"सारी रात्र"** हे नाटक **सिध्दिविनायक क्रिऐशन, सांतिनेज, पणजी** ही संस्था सादर करणार आहे. दि.११ जानेवारी रोजी कृष्णाजी बाजीराव भोसले यांच्या लेखणीतून उतरलेले **"रक्तरंगण"** या नाटकाचा प्रयोग **चौरंग, नागेशी, बांदोडा-फोंडा** ही संस्था सादर करणार आहे. **नादब्रंम्ह सत्तरी** ही संस्था सुरेश पिप्रोडिया यांच्या लेखणीतून साकार झालेल्या व प्रविण मराठे यांनी अनुवादित केलेले **"असला नवरा नको गं बाई"** हे नाटक दि.१७ जानेवारी रोजी सादर करेल.

दि.१८ जानेवारी २०२१ रोजी **श्री ओंकार थिएटर्स्, पेडणे** या संस्थेच्या पांडुरंग आत्माराम गावडे लिखित **"सखी जन्मांतरीची"** हे नाटक सादर करणार असून दि. १९ जानेवारी रोजी अभिराम भडकमकर यानी लिहिलेले **"सुखांशी भांडतो आम्ही"** हे नाटक **श्री पांडुरंग प्रासादिक नाटय मंडळ, विठ्ठलापूर-साखळी** ही संस्था सादर करणार आहे. **श्री साई कला मंडळ, सांगोल्डा-बार्देश** या संस्थेच्या वतीने वसंत कानेटकर लिखित **"कस्तुरी मृग"** हे नाटक दि.२० जानेवारी रोजी होईल. विश्राम बेडेकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **"टिळक आणि आगरकर"** हे नाटक दि.२१ जानेवारी रोजी **श्री मांगिरिष यूथ क्लब, मंगेशी-गोवा** ही संस्था सादर करेल तर दि. २४ जानेवारी रोजी अमेय दक्षिणदास यांनी लिहिलेल्या **"द कॉन्शन्स"** या नाटकाचा प्रयोग **सुयोग कला मंच, करमळी-गोवा** ही संस्था सादर करणार आहे. दि.२५ जानेवारी रोजी बाळ कोल्हटकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **"सीमेवरुन परत जा"** हे नाटक **श्री भुमिका नाटय मंडळ, पर्ये मठ-सत्तरी** ही संस्था सादर करणार आहे. दि.२७ जानेवारी रोजी विष्णु सुर्या वाघ यांच्या लेखणीतून उतरलेल्या **"युध्द नको मज बुध्द हवा"** या नाटकाचा प्रयोग **श्री महादेव भुमिका संगीत सांस्कृतिक मंडळ, हळर्ण, पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. **रंगसांगाती, काणकोण** ही संस्था उदय नाईक लिखित **"शिवांगार"** हे नाटक दि.२८ जानेवारी रोजी सादर करेल.

दि.३१ जानेवारी रोजी राजेंद्र नारायण पोळ यांच्या लेखणीतून साकार झालेले "**इथर**" हे नाटक **सियावर राम, गिमोणे, पिळगांव-डिचोली** ही संस्था सादर करणार आहे. दि.१ फेब्रुवारी रोजी जयंत पवार यांच्या लेखणीतून उतरलेल्या "**अधांतर**" या नाटकाचा प्रयोग **सातेरी कला मंदिर, हंसापुर, पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. **नाटयसंपदा-गोवा** ही संस्था वसंत कानेटकर लिखित "**इथे ओशाळला मृत्यू**" हे नाटक दि.२ फेब्रुवारी रोजी सादर करेल. दि. ३ फेब्रुवारी रोजी इरफान मुजावर यानी लिहिलेले "**पूर्णविराम**" हे नाटक **सांस्कृतिक कला मंच, सांगे-गोवा** ही संस्था सादर करणार आहे. **कलासंगम, हेडलँड सडा, मुरगाव** या संस्थेच्या वतीने श्रीकांत करगुटकर लिखित "**इना मिना डिका**" हे नाटक दि.४ फेब्रुवारी रोजी होईल. तर दि.७ फेब्रुवारी रोजी स्पर्धेचा समारोप **ललितप्रभा नाटयमंडळ, वळवई-फोंडा** या संस्थेच्या विष्णु सुर्या वाघ यांनी लिहिलेले " **शिवगोमंतक**" या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून रु.५०/-च्या प्रवेशिका रविंद्र भवन, साखळीच्या तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटय रसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी